# दोन ध्रुवांवरचे जग

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

मे २०१६ च्या 'आंदोलन'मध्ये 'पनामा पेपर्स' चा आढावा घेतला होता. जगातील अति-श्रीमंत मंडळी, कंपन्या ज्या देशात असतात, तेथील कर चुकवण्यासाठी काय प्रमाणात पैसा परदेशी कसा लपवतात हे पनामा पेपर्सने उघडकीला आणले. तेव्हाच हे हिमनगाचे टोक असल्याचा उल्लेख केला होता.

आता या हिमनगाचा आणखी थोडा खालचा भाग समोर आला आहे. पनामा पेपर्ससारखाच हा शोध-पत्रकारितेचा विजय आहे. बर्म्युडामधील ॲपलबाय (Appleby) नावाच्या एका कंपनीकडे असणारी अति-श्रीमंतांच्या परदेशी खात्यातील ही माहिती आहे. ही कंपनी ११६ वर्षे जुनी आहे. अशा खात्यांना ऑफशोअर आकाऊंटस् म्हणतात. ही माहिती अतोनात गुप्त असते. किंबहुना त्या गुप्ततेच्या भरोशावरच हे लोक असे व्यवहार अशा संस्थांतर्फे करतात. बरीचशी खाती बेनामी असतात. पत्रकारांनी त्यामागे खरोखर कोण आहे याचा शोध घेतला. खात्यांची नावे, त्यात असलेले अब्जावधी डॉलर्स इत्यादी गुप्त माहिती बाहेर आली. ही माहिती म्हणजे पॅरेडाईज पेपर्स. या गौप्य-स्फोटाचा आवाका पुढील आकडेवारीवरून स्पष्ट व्हावा. एकूण सुमारे दीड कोटी कागदपत्रे तपासण्यात आली. ती ६७ देशांतील ९० वृत्त-संस्थातील ३८० पत्रकारांनी गेले वर्षभर तपासली. त्यांचे अहवाल जगभरच्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांमध्ये ६ नोव्हेंबरपासून प्रसिद्ध होत आहेत.

आजवरच्या माहितीनुसार जगातील मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, राजकीय नेत्यांचे नातलग कर-मुक्त प्रदेशात पैसा गुंतवत असल्याचे दिसत आहे. उदा. ॲपल या कॉम्पुटर क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने पनामा पेपर्सनंतर 'आम्ही असले व्यवहार करत नाही' असा दावा केला होता. त्यांनी पनामा पेपर्समधल्या ऑफशोअर बँकांमध्ये नाही, पण आयर्लंडमधील कर-मुक्त प्रदेशात अब्जावधी डॉलर्स जमा केल्याचे पॅरेडाईज पेपर्समध्ये आढळले आहे. ब्रिटनची राणी, अमेरिकेचा सध्याचा व माजी वाणिज्यमंत्री, अमेरिकी अध्यक्ष ट्रम्पचा जावई (जारेद कुशनेर), रशियाचा अध्यक्ष पुतीनचा जावई, लेविस हॅमिल्टन हा मोटारींच्या शर्यतीत प्रचंड पैसे मिळवणारा विक्रमवीर, इत्यादी अनेक बडी धेंडे संशयास्पद आणि कायदेशीरदृष्ट्या संदिग्ध व्यवहारात आढळून आली आहेत.

दिसते तेवढे हे प्रकरण साधे नाही. बऱ्याचशा खातेदारांनी त्यांच्या देशांचा कायदा मोडलेला नाही. सामान्यत: कोणालाही परदेशात बँकेत खाते उघडता येते. पण ही कृती कायदेशीर होती की बेकायदेशीर या फक्त कायद्याच्या संकुचित मापदंडाने पाहता येत नाही. ती कृती नैतिक का अनैतिक या अधिक वरच्या मूल्यावर पहावी लागेल. त्यानुसार बरीच खाती अनैतिक दिसतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतील काही विद्यापीठांनी त्यांच्याकडे असणारे लक्षावधी डॉलर्स एका न्यासातर्फे एका बँकेच्या ऑफशोअर खात्यात भरले. न्यास हे पैसे विद्यापीठातर्फे विविध कंपन्यांमध्ये गुंतवत असे. यातील काही कंपन्या तेल, नैसर्गिक वायू यांच्या उत्पादनाशी संबंधित आहेत. हे उत्पादन अनैतिक आहे, ते अगदी लगेच बंद नाही तरी नजीकच्या भविष्यात कमीत कमी करायला हवे असे मानणारा पर्यावरणवादी वर्ग अमेरिकेत आहे. विशेषत: विद्यापीठातील विद्यार्थी या इंधनाच्या उत्पादनाविरुद्ध असतो. त्यामुळे या गुंतवणुकी बाहेर आल्यास विद्यापीठात निषेध सुरु होतील ही विद्यापीठाच्या अधिकारी वर्गाची भीती. म्हणून गुप्तता. या गुंतवणुकीत त्या विद्यापीठांनी (उदा. टेक्सास व इंडीआना) अमाप पैसा मिळवला.(देशभरातील विद्यापीठांची अशी मिळकत सुमारे ५०० अब्ज डॉलर). ही वाट त्या न्यासाने दाखवली. अमेरिकन कायद्यातील एक पळवाट त्यासाठी उपयोगी पडली. म्हणजे, तांत्रिकदृष्ट्या कायदा मोडला नाही पण कृती अनैतिकच. या न्यासाच्या संस्थापकांपैकी एक - माजी रिपब्लिकन अध्यक्ष जॉर्ज बुश यांचा निकटवर्ती. तो त्यांच्या मंत्रीमंडळातही २००१ पासून २००५ पर्यंत होता. म्हणजे राजकीय उच्चपदस्थ, शैक्षणिक क्षेत्राचे बाजारीकरण करणारे उच्चपदस्थ यांच्या संगनमताने हे अनैतिक व्यवहार झाले.

वर उल्लेख केलेल्या मंडळीतील ब्रिटनच्या राणीच्या वैयक्तिक मालमत्तेतील एका कंपनीने काही नवे तंत्रज्ञान विकसित केलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली. त्यातून नफाही मिळवला. एका कंपनीला तर समाजाच्या दुबळ्या स्तरातील ग्राहकांना वर्षाला १००% व्याज लावून सावकारी केल्याबद्दल ताशेरे मिळाले होते. अशा व्यवहारांची माहिती इंडियन एक्स्प्रेसने दिलेली आहे. त्यामुळे इथे त्याची द्विरुक्ती केलेली नाही.

नैतिकतेबरोबरच राजकीयदृष्ट्या गैरसोईची माहितीही पॅरेडाईज पेपर्समधून बाहेर आली आहे. उदाहरणार्थ, एका रशियन अब्जाधीशाने फेसबुक आणि ट्विटर या अमेरिकन मोठ्या व वाढत्या कंपन्यांमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. तो पैसा रशियन सरकारी बँक व कंपन्यातून आला. त्यायोगे या कंपन्यांवर रशियन धोरणांचा

परिणाम झाला का हे निश्चित नाही. हिलरी क्लिंटनविरुद्धच्या निवडणुकीत स्टिव बॅनन हा ट्रम्पचा सल्लागार होता. ट्रम्पच्या प्रचारातील बाईविरुद्ध वापरलेला काही पैसा अशाच ऑफशोअर खात्यातून आला असल्याचा संशय आता व्यक्त होत आहे.

हे लोक जेथे राहतात, ज्या देशाचे नागरिक आहेत, जेथे संपत्ती निर्माण करतात, तेथील कर चुकवण्यासाठी त्यांनी कायद्यातून पळवाटा काढल्या, उदा. ब्रिटनमध्ये गरीबी वाढत असताना, राष्ट्रीय आरोग्यसेवेला पैशाची तातडीची निकड असताना, सामाजिक कार्यासाठी सरकारला उपलब्ध होऊ शकणारा पैसा या लोकांनी परदेशी नेला. हा खरा मुद्दा आहे.

मृत्यू आणि कर हे अपरिहार्य आहेत अशी एक म्हण आहे. त्यातील कर काही मूठभरांसाठी परिहार्य दिसतो.

## येमेनमधील अशांतता

ज्या पृथ्वीवर बहुतेक मालमता वरील थोड्या मंडळींच्या हातात एकवटलेली आहे, त्याच पृथ्वीवर दुसऱ्या ध्रुवावर कमालीच्या हिंसेचे आणि भुकेचे बळी नव्याने निर्माण होत आहेत.

येमेनमध्ये बरीच वर्षे अशांतता आहे. जमातींमधील वैर, शिया-सुन्नी संघर्ष या अंतर्गत घटकांना मध्य-पूर्वेतील दोन प्रमुख शक्ती -सुन्नी सौदी अरेबिया आणि शिया इराण, यांचा परस्परविरोधी सशस्त्र पाठिंबा आहे. त्यांची मध्य-पूर्वेवरील आधिपत्यासाठी साठेमारी येमेनचा विनाश करत आहे. शिवाय, अल्-कईदा व इस्लामिक स्टेटचा विस्तारवाद हेही हिंसक घटक आहेत. त्यातील अल्-कईदाच्या ताब्यात दक्षिणेची राजधानी एडन काही काळ होती. किमान २०१५ पासून यादवी तीव्र झाली आहे.

ती दोन पक्षांमध्ये - एक शियापंथीय हूथी जमात त्यांच्या विरुद्ध सत्ताधारी सुन्नी. आता सौदी अरेबियाने आपला हस्तक्षेप वाढवला आहे. अमेरिका व ब्रिटनच्या सहकार्याने सौदी अरेबिया येमेनमधील हूथी प्रदेशावर हल्ले करत आहे. बळी सामान्य माणूस. सौदी अरेबियाला ४.६ बिलियन डॉलर्सचा शस्त्र-पुरवठा करण्याचा करार ब्रिटनने केला आहे. त्या प्रदेशाचा अन्न-पुरवठा रोखण्याचाही प्रयत्न आहे. त्यामुळे सामान्यांचे भूक-बळी जायला सुरुवात झाली आहे. येमेनचा ९० टक्के अन्न व इंधन पुरवठा आयात होतो. तो प्रामुख्याने ज्या बंदरातून होतो, ते बंदर सौदी अरेबियाने ताब्यात घेतले आहे. त्यातून हूथींना इराण शस्त्र पुरवठा करतो असा सौदीचा दावा. हे बंदर संयुक्त राष्ट्र-संघाच्या अखत्यारीत देणे हा सौदीचा प्रस्ताव आहे. तोपर्यंत होणाऱ्या सामान्य माणसाच्या हाल-अपेष्टांची त्यांना किंवा त्यांच्या दोस्त राष्ट्रांना फिकीर नाही. आज सौदी-अमेरिका-ब्रिटन यांच्या प्रभावक्षेत्रात मदत थोडीफार पोचत आहे. हूथींच्या प्रदेशात नाही. वस्तुत: गरज दोन्हीकडे तितकीच तीव्र आहे. बाजारात अन्न उपलब्ध आहे पण त्याच्या किंमती लोकांना परवडण्यासारख्या नाहीत. आजवर या संघर्षाने कोटीत लोक विस्थापित झाले आहेत. दोन कोटी लोकांना अन्नाची, वैद्यकीय सेवेची तातडीची जरुरी आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या अंदाजानुसार या वर्ष अखेरीपर्यंत दीड लाख मुले भूकबळी जातील. आजच १३० मुले रोज मरण पावतात असा 'सेव्ह दि चिल्ड्रेन' या संस्थेचा अंदाज आहे. नऊ लाख लोक कॉलराग्रस्त आहेतच, त्यात संभाव्य नवीन फैलावाने भर पडेल. कारण इंधनाच्या अभावी पाणी व सांडपाणी यांचे नियोजन बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अस्थिर परिस्थितीमुळे स्वयंसेवी संघटना मदत करूही शकत नाहीत.

येमेनची राजधानी साना. ती बंडखोर हूथी जमातीच्या ताब्यात आहे. एडन हे दुसरे महत्त्वाचे शहर. तत्कालीन अध्यक्ष हादी याला बंडखोरांनी २०१५ मध्ये पदच्युत केले, तेव्हा तो सानाहून एडनला पळाला. त्याचे समर्थक आणि हूथी बंडखोर यांच्यात तेव्हापासून युद्ध चालू आहे. हादी हा अध्यक्ष आहे हे हूथी मानतच नाहीत. हादीच्या आधीच्या अध्यक्षाला नाइलाजाने सत्ता सोडावी लागली होती. त्याची हूथींना हादीविरुद्ध फूस आहे. त्याबरोबरच शिया इराण हूथींच्या बाजूने आहे.

येमेनचा इतिहास पाहता, १९६७-६८ ला वसाहतवादापासून मुक्त होऊन उत्तर येमेन आणि दक्षिण येमेन ही दोन स्वतंत्र राष्ट्रे जन्माला आली. दक्षिण येमेन रशियाच्या प्रभावाखाली 'समाजवादी' राष्ट्र झाला तर उत्तर येमेन कोणत्याच आंतरराष्ट्रीय प्रस्थापित गटाशी (लोकशाही पश्चिम किंवा कम्युनिस्ट रशियाशी) संलग्न झाला नाही. दोन देशांतील संबंध सलोख्याचे नव्हते. १९७२ व १९७९ ला त्यांच्यात युद्धेही झाली. अखेर आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपाने १९९० ला दोन्ही राष्ट्रे मिळून आताचे येमेन जन्माला आले. पण पूर्वीची दुष्मनी कायम राहिली. आताची परिस्थिती पहाता, देशाचे परत तुकडे पडणे शक्य दिसते. एकेकाळी एडन हे मध्य-पूर्वेतील महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय बंदर होते व त्यावेळी आजचा दक्षिण येमेन प्रगत प्रांत होता. या रम्य भूतकालाचा पगडा अजून तेथील लष्करी नेतृत्वावर आहे. या प्रदेशातून अल्-कईदाला हुसकावून लावल्यानंतर हा आत्मविश्वास वाढला. ही प्रश्नाची येमेनअंतर्गत बाजू.

बाहेरचा प्रभाव पहाता, येमेनवर युद्ध लादले ते सौदी अरेबियाने. २०१५ पासून इराणच्या प्रभावाखालील हूथी विद्रोहाला आळा घालायचा म्हणून ही कारवाई सुरु झाली. तिचा शिल्पकार त्या वेळचा संरक्षणमंत्री एक सौदी राजपुत्र, तो आता, सौदीच्या घराणेशाहीतील दुसऱ्या क्रमांकाचा अतिउच्चपदस्थ आहे. तो आणि ट्रम्पचा जावई हे दोस्त आहेत. ट्रम्पचा जावई - कुशनेर - (त्याचा वरील लेखात उल्लेख आहे) हा व्हाईट हाऊसमध्ये अधिकृतरीत्या ट्रम्पचा मध्य-पूर्वेविषयी सल्लागार आहे. त्यामुळे या युद्धात अमेरिकेने सतत सौदीचा पाठपुरावा केलेला आहे. ही अनिष्ट व

*(पान २७ वर)*

***जगभर,*** *(पान ११ वरून)*
*(पान ११ वरून)*

धोकादायक वैयक्तिक जवळीक मध्य-पूर्वेतील अमेरिकेचे धोरण ठरवते. त्यामुळे आधीच अस्थिर व हिंसक वातावरणात भर पडणार हे नक्की.

या धोरणाच्या मानवी वेदनेच्या परिणामांची पर्वा ना सत्ताधीशांना, ना जगभरच्या सामान्य माणसाला.

म्हणजे, एकीकडे अति-श्रीमंत व त्यांची वाढती श्रीमंती तर दुसरीकडे हलाखीच्या परिस्थितीतून आणखी हलाखीच्या परिस्थितीत ढकलले जाणारे काही कोटी लोक हे चित्र आहे. यामधली जगभरची विशाल, बहुसंख्य जनता उदासीन आहे.

*wwww.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*